**ग्रंथसंस्कृती जोपासना अभियानाकरीता आकस्मिकता निधी अग्रीम मंजूर करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**मराठी भाषा विभाग,**

शासन निर्णय क्रमांक - योजना-१०११/प्र.क्र.७६/२०११/भाषा-३,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

**दिनांक - २८ नोव्हेंबर, २०११.**

**संदर्भ** :- वित्त विभाग, ज्ञापन क्रमांक - आकनि-२०.११/२७/अर्थसंकल्प-१४, दिनांक २८.११.२०११.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत ग्रंथ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रंथोत्सव जोपासना अभियान अंतर्गत ग्रंथोत्सव - २०११ हा उपक्रम राज्यातील सर्व जिल्हयाच्या ठिकाणी राबविण्याकरीता रु.३५.०० लक्ष (रु.पस्तीस लक्ष फक्त) इतका निधी आकस्मिकता निधी अग्रीमाव्दारे मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. प्रकाशक आणि ग्रंथविक्रेते यांना ग्रंथविक्रीसाठी आणि ग्रंथप्रेमींना एकाच ठिकाणी शासकीय व विविध ग्रंथ प्राप्त होण्याकरीता सुविधा उपलब्ध करुन देणे हा या ग्रंथोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयाव्दारे ग्रंथोत्सव २०११ हा उपक्रम राज्यातील प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या ३३ जिल्हा माहिती अधिकाऱ्यांमार्फत डिसेंबर २०११ मध्ये राबविण्यासाठी आकस्मिकता निधी अग्रीमाव्दारे मंजूर करण्यात आलेला रु.३५.०० लक्ष (रुपये पस्तीस लक्ष फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या कार्यालयास संक्षिप्त देयकाव्दारे आहरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून **एक विशेष बाब** म्हणून शासन मान्यता देण्यात येत आहे. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी सदर निधी संबंधित जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना प्रत्येकी रु.१.०० लक्ष (रुपये एक लक्ष फक्त) याप्रमाणे तात्काळ वितरीत करावा.

अ) विभागाकडे संक्षिप्त देयकावर काढलेल्या रकमांचे एक तपशिलवार देयक सादर करणे प्रलंबित आहे. त्याचे तपशिलवार देयक तातडीने सादर करण्यात येईल.

ब) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्यात येईल.

क) खर्च नियमित देयकाव्दारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

ड) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची व्यक्तिगत जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांची राहील.

२. ग्रंथोत्सव - २०११ करीता वित्त विभागाच्या संदर्भाधीन ज्ञापनाव्दारे रु.३५.०० लक्ष (रुपये पस्तीस लक्ष फक्त) इतका निधी आकस्मिकता निधी अग्रीमाव्दारे मंजूर करण्यात आला आहे. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. हा खर्च शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि-२०.११/२७/अर्थसंकल्प-१४, दिनांक २८.११.२०११ व **आकस्मिकता निधी संकेतांक** (८००० ६०३२) अन्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.३५.०० लक्ष (रुपये पस्तीस लक्ष फक्त) इतक्या आकस्मिकता निधीमधून भागविण्यात यावा. तसेच अग्रिमामधून प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती शासनास तात्काळ सादर करावी.

४. रक्कम मंजूर करावयाच्या देयकावर "**आकस्मिकता निधी अग्रिम**" असे लाल शाईने ठळक अक्षरात नमूद करण्याची खबरदारी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी घ्यावी. तसेच आकस्मिकता निधीतून खर्च करताना सादर करण्यात येणाऱ्या देयकांवर आकस्मिकता निधी अग्रिम शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि-२०.११/२७/अर्थसंकल्प-१४, दिनांक २८.११.२०११ व आकस्मिकता निधी संकेतांक (८००० ६०३२) अन्वये मंजूर असे लाल शाईने लिहावे व ते लाल शाईने अधोरेखित करावे.

५. संबंधित नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक - सीएनएफ-१०८३/१४०/अर्थसंकल्प-३, दिनांक २६ एप्रिल, १९८३ व शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक - सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट, १९८६ यांव्दारे केलेल्या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

६. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात, मागणी क्रमांक झेडएफ ०२ - २२०५ - कला व संस्कृती (०२) (०२) - राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (२२०५ ३२१४) - ३१ - सहायक अनुदाने (वेतनेतर) (योजनांतर्गत) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७५६/११/व्यय-४, दिनांक २४.११.२०११ व अनौपचारीक संदर्भ क्र.६३२/११/विनियम, दिनांक २८.११.२०११ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

( संगणक संकेतांक क्र - २०१२१२१०१६३३२७३०३३ )

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ललिता शि. देठे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१. सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
२. सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
३. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
४. संचालक / उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (१० प्रती),
५. सर्व संबंधित जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१०. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
११. वित्त विभाग (व्यय - ४ / विनियम / अर्थसंकल्प -३ / अर्थसंकल्प - १४), मंत्रालय, मुंबई,
१२. सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
१३. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. संचालक, भाषा संचालनालय, मुंबई,
१५. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१६. प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
**१७. भाषा - ३ (संग्रहार्थ).**